सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# चिपळुणातील साहित्य संमेलनाला आम्ही येणारच

-
Monday, September 17, 2012 AT 12:15 AM (IST)

चिपळूण- येथे होणाऱ्या 86 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या तयारीचा एक भाग म्हणून देश-विदेशात संपर्क अभियान सुरू करण्यात आले आहे. अमेरिकेत असलेल्या अनेक मराठी बांधवांनी साहित्य संमेलनाचा येणारच, असे आश्‍वासन संयोजन समितीला दिले आहे.

साहित्य संमेलनाला देश-विदेशातून साहित्यिक यावेत म्हणून संयोजन समितीतर्फे संपर्क मोहीम सुरू करण्यात आली आहे. अमेरिकेत संमेलनाचे निमंत्रण गेल्यानंतर तेथून आम्ही संमेलनाला येणारच असे आश्‍वासन मराठी बांधवांनी दिले. "आम्ही येणारच आहोत' अशा शब्दात त्यांनी संयोजन समितीला कळविले. अमेरिकेतील उद्योजक मंदार जोगळेकर यांनी संयोजन समितीला सांगितले की, आम्ही मंडळी अमेरिकेत वास्तव्याला असलो, तरी मराठीपण टिकवून आहोत. कोकणातील असंख्य तरुण आज जगभर गेले आहेत. त्यांनाही कोकणची ओढ आहेच. चिपळूणला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. त्यासाठी मी उपस्थित राहणारच आहे. बुकगंगा डॉट कॉमच्या माध्यमातून हजारो मराठी ग्रंथ वाचकापर्यंत नेण्याचा उपक्रम राबविणारे मंदार जोगळेकर हे मूळचे संगमेश्‍वर तालुक्यातील साखरपा गावचे आहेत.

संमेलनाबद्दल सविस्तर माहिती घेण्यासाठी त्यांनी संमेलन कार्यालयाला भेट

दिली. यावेळी संमेलनाचे कार्यवाह धनंजय चितळे यांनी सविस्तर माहिती दिली. संमेलन यशस्वी होण्यासाठी संघटित केलेल्या विविध समित्यांची तसेच सर्वस्तरातून मिळणारा पाठिंबा याची माहिती यावेळी त्यांना देण्यात आली. मंदार जोगळेकर यांनी संमेलनाच्या कार्यक्रमांचे चित्रण जगभर मराठी बांधवाना बघता यावे यासाठी बुकगंगा संस्था सर्वतोपरी साह्य करेल. तसेच संमेलनाला परदेशस्थ अर्थसाह्य करतील. यासाठी अमेरिकेतील आम्ही मराठी बांधव एकत्र येऊन प्रयत्न करू, असे सांगितले. कार्यवाह अरुण इंगवले, मधुसूदन केतकर, रमेश चिपळूणकर यांनी यावेळी चर्चेत भाग घेतला. रमेश चिपळूणकर यांनी आभार मानले

© eSakal.com, all rights reserved